राष्ट्रीय छात्रसेना योजनेसाठी राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध भत्यांचे दर सुधारीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : राछासे२७१६/प्र.क.१०/क्रीयुसे-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ०३ जानेवारी, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१७८९/४३/(४२६/९८)माशि-५ दि. २४.८.१९९८
२. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. ११.७.२००३
३. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. ११.७.२००३
४. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. ११.७.२००३
५. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. २८.१.२००४
६. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. २८.१.२००४
७. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-१००१/(२३८/२००१)माशि-७ दि. २८.१.२००४
८. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. राछासे२०१२/प्र.क्र.१८१/१२/ क्रीयुसे ३, दि. ७.१२.२०१२
९. शासन निर्णय शा.शि.विभाग क्र. एनसीसी-२६१६/प्र.क्र.९०/क्रीयुसे-३, दि. २०.३.२०१६.
१०. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/Mess All/DGNCC/Budget/७२४/D(GS-VI)/२०१५ dtd.२६/९/२०१३.
११. एनसीसी संचालनालय महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्र. ८०००/NCC/Accts/Messing/(PRCN/Ref) दि. २१/५/२०१३.
१२. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३२१६/Incdl/DGNCC/P&F (Coord)/५०३/D(GS-VI)१४, दि.१२/८/२०१४.(Incidental Allowance)
१३. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/RP/DGNCC/P&F (Coord)/७२४/D(GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.
१४. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/HON/DGNCC/P&F (Coord)/७२४/D(GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.
१५. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/DA/DGNCC/P&F (Coord)/७२४/D(GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.
१६. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/ATG/DGNCC/P&F (Coord)/ ७२४/D (GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.
१७. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/CT/DGNCC/P&F (Coord)/७२४/D(GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.

१८. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/POL/DGNCC/P&F (Coord)/५०३/ D (GS-VI)/२०१४, दि. २४/७/२०१५.

१९. केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ३३७२/OA/OMA/DGNCC/P&F (Coord)/७२४/ D (GS-VI)/२०१५, दि. २४/७/२०१५.

२०.केंद्र शासनाचे रक्षा मंत्रालयाचे पत्र क्र. ०१७३/DGNCC/Budget, दि. २६/५/२०१६.

**<u>प्रस्तावना:</u>**

शिक्षण संस्थेतील माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सन १९४८-४९ मध्ये राष्ट्रीय छात्रसेना दलाची देशव्यापी स्वरुपात स्थापना करण्यात आली असून राष्ट्रीय छात्रसेनेची तरतूद व रचना करण्याच्या दृष्टीने "राष्ट्रीय छात्रसेना कायदा, १९४८" हा अधिनियम करण्यात आला आहे. राष्ट्रीय छात्रसेना योजनेखालील विविध शिबीरे व प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध भत्ते दिले जातात. केंद्र शासनामार्फत या भत्यांच्या दरात वेळोवेळी वाढ केल्यावर राज्य शासनाने देखील त्यानुसार वाढ करणे अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय छात्रसेना योजनेसाठी केंद्र शासनाने भत्यांच्या दरात वाढ केल्यानुसार राज्याच्या हिस्स्याच्या भत्यांच्या दरात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

राष्ट्रीय छात्रसेनेच्या अंशकालीन अधिकाऱ्यांना व छात्रसैनिकांना विविध शिबीरे व प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी येणाऱ्या अंशकालीन दर्जा वेतन, अंशकालीन अधिकारी मानधन, दैनिक भत्ता, वार्षिक प्रशिक्षण, काळजीवाहू भत्ता, प्रासंगिक दर, पेट्रोल भत्ता व आऊटफीट मेंटेनन्स भत्यांच्या दरात केंद्र शासनाने वाढ केल्याप्रमाणे सुधारित दर हा शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू होतील. तथापि खालील ९ बाबींपैकी बाब क्र. ६ येथील भोजन भत्यावरील वाढ ही सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून म्हणजेच एप्रिल २०१८ नंतरच लागू राहतील.

| अ.क्र. | भत्ता | सध्याचे दर (रु) | सुधारित दर (रु) | सध्याचा | सुधारित |
|---|---|---|---|---|---|
| १. | अंशकालिन अधिकारी दर्जा वेतन | PAY OF RANK | | केंद्र/राज्य हिस्सा | केंद्र/राज्य हिस्सा |
| | १) मेजर<br>२) कॅप्टन<br>३) लेफ्टनंट<br>४) चीफ ऑफीसर<br>५) फर्स्ट ऑफीसर<br>६) सेंकड ऑफीसर<br>७) थर्ड ऑफीसर | ११३००(दरमहा)<br>९३००(दरमहा)<br>८०००(दरमहा)<br>६६००(दरमहा)<br>५४००(दरमहा)<br>४४००(दरमहा)<br>३२५०(दरमहा) | २२६०० (दरमहा)<br>१८६०० (दरमहा)<br>१६००० (दरमहा)<br>१३२०० (दरमहा)<br>१०८०० (दरमहा)<br>८८०० (दरमहा)<br>६५०० (दरमहा) | ७५:२५ | ७५:२५ |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | अंशकालिन अधिकारी मानधन :- | Honorarium to Associate NCC officers | | | |
| | १) मेजर<br>२) कॅप्टन<br>३) लेफ्टनंट<br>४) सेकंड लेफ्टनंट<br>५) चीफ ऑफीसर<br>६) फर्स्ट ऑफीसर<br>७) सेंकड ऑफीसर<br>८) थर्ड ऑफीसर | ११००(दरमहा)<br>१०००(दरमहा)<br>९००(दरमहा)<br>८००(दरमहा)<br>८५०(दरमहा)<br>८००(दरमहा)<br>७५०(दरमहा)<br>७००(दरमहा) | ३००० (दरमहा)<br>२५०० (दरमहा)<br>२००० (दरमहा)<br>निरंक<br>२५०० (दरमहा)<br>२२०० (दरमहा)<br>२००० (दरमहा)<br>१८००(दरमहा) | ००:१०० | ५०:५० |
| ३. | अंशकालिन अधिकारी व छात्रसैनिकांना दैनिक भत्ता | DAILY ALLOWANCE | | | |
| | १) अंशकालिन अधिकारी<br>२) छात्रसैनिक | ३५ (प्रतिदिन)<br>३० (प्रतिदिन) | १३० (प्रतिदिन)<br>१२५ (प्रतिदिन) | ७५:२५ | ७५:२५ |
| ४. | कंपनी व ट्रुप्सचे वार्षिक प्रशिक्षण :- | | | | |
| | १) कंपनी<br>२) ट्रुप्स | २००० (प्रतिवर्ष)<br>१००० (प्रतिवर्ष) | ६००० (प्रतिवर्ष)<br>३००० (प्रतिवर्ष) | ६०:४० | ६०:४० |
| ५. | काळजीवाहू भत्ता | ANO (CARE TAKER ALLOWANCE) | | | |
| | १) वरिष्ठ गट/विंग<br>२) कनिष्ठ गट/विंग | ५०० (दरमहा)<br>४०० (दरमहा) | १५०० (दरमहा)<br>१२०० (दरमहा) | ००:१०० | ००:१०० |
| ६. | भोजन भत्ता (प्रतिछात्र):- | (MESSING ALLOWANCES) | | | |
| | अ) विविध प्रशिक्षण शिबीरे ( Camps/ Expedition) | | | | |
| | १. अशंकालीन अधिकारी<br>२. छात्रसैनिक | ७२ (प्रतिदिन)<br>७२ (प्रतिदिन) | १०० (प्रतिदिन)<br>९५ (प्रतिदिन) | ७५:२५ | ७५:२५ |
| | ब) विशेष एन. आय. सी. | NATIONAL INTEGRATION CAMP | | | |
| | १. अशंकालीन अधिकारी<br>२. छात्रसैनिक | १२० (प्रतिदिन)<br>१२० (प्रतिदिन) | १५० (प्रतिदिन)<br>१५० (प्रतिदिन) | ७५:२५ | ७५:२५ |
| | क) प्री कमिशन/रिफ्रेशर ट्रेनिंग कॅम्प | | | | |
| | १. अंशकालिन अधिकारी | ७२ (प्रतिदिन) | २१३ (प्रतिदिन) | ००:१०० | ५०:५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | प्रशिक्षण व शिबीरामधील छात्राचे अनुषंगिक दर | INCIDENAL ALLOWANCE | | | |
| | १. छात्रसैनिक | १२ (प्रतिदिन) | १८ (प्रतिदिन) | ७५:२५ | ७५:२५ |
| ८. | प्रशिक्षण व शिबीराकरिता लागणाऱ्या पेट्रोलचे दर (प्रतिछात्र/अंशकालीन अधिकारी): | | | | |
| | १. वार्षिक प्रशिक्षण शिबिरे<br>२. केंद्रिय स्तरावरील शिबीरे<br>३. लुब्रीकंट (६ टक्के) | ५५ (प्रतिदिन)<br>८० (प्रतिदिन) | १४० (प्रतिदिन)<br>२१० (प्रतिदिन) | ७५:२५ | ७५:२५ |
| ९. | अंशकालिन अधिकाऱ्यांचा आऊटफीट मेंटेनन्स अलाऊंस | ४८० (प्रतिमाह) | १८०० (प्रतिमाह) | ००:१०० | ००:१०० |

२. वरील परिच्छेदामधील बाब क्र.६ वगळून उर्वरित बाबींकरिता राज्य शासनाकडून करण्यात येणारा खर्च मागणी क्र. ई-३ २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०२, विद्यार्थ्याकरिता युवक कल्याण कार्यक्रम (०१) (०१) राष्ट्रीय छात्रसेना (२२०४-००१६) या लेखशीर्षातंर्गत २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून त्या त्या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. राज्य शासनाकडून गत ३ वर्षामध्ये वितरीत अनुदाने व त्यामधून झालेल्या खर्चाचे निर्धारण (Assessment of Grants) आयुक्त, क्रीडा यांचे कार्यालयातील लेखा/लेखापरिक्षण शाखेने मार्च २०१८ पूर्वी पूर्ण करावे.तसेच यापूढे दर वर्षी वितरीत होणाऱ्या अनुदान निर्धारणाची कार्यवाही आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्या कार्यालयातील लेखा/लेखापरिक्षण शाखेने करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौ.सं.क्र. १०६९/व्यय-५, दि. १५/११/१७ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०१०३१४३१०३८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.01.03 14:37:22 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत :**

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. अपर महानिदेशक, एन.सी.सी. संचालनालय, महाराष्ट्र , मुंबई
३. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
४. महालेखापाल (लेखा ), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७. सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य
८. जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
९. वित्त विभाग (व्यय-५)/नियोजन विभाग (का. १४७१), मंत्रालय, मुंबई.
१०.कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.सर्व गटप्रमुख, गटमुख्यालय, राष्ट्रीय छात्रसेना.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१४.निवड नस्ती (क्रीयुसे-१ व २).